भारत सरकार

नियोजन आयोग

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण

प्रसिद्धी पत्रक

नवी दिल्ली 10 सप्टेंबर 2014

भारत सरकारच्या आर्थिक बाबींविषक मंत्रिमंडळ समितीने आपल्या आज झालेल्या बैठकीत भारतीय विशिष्ट ओळख प्रकल्पाच्या पाचव्या टप्प्याला मंजूरी दिली. या टप्प्यात उत्तर प्रदेश, बिहार, छत्तीसगढ व उत्तराखंड या चार राज्यात आधारसाठी नोंदणी करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. यामुळे भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणास 2015 अखेर पर्यंत 100 कोटी लोकांना आधार देण्याचे लक्ष्य देण्यात आले आहे ज्यात राष्ट्रीय जनगणना रजिस्ट्रार (एनपीआर) ला देण्यात आलेल्या 12 राज्यांचा/केंद्र शासित प्रदेशांचा समावेष आहे. आधार संपर्क केंद्र, माहिती शिक्षण व संपर्क मोहिम, दस्तऐवज व्यवस्थापन प्रणाली, भाडे दर आणि कर बाबत व्यापक प्रस्ताव व सुधारित खर्चाचे अंदाजपत्रक भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणामार्फत तयार करण्यात येतील व खर्च वित्त समितीला सादर करण्यात येतील.

आपणाय ज्ञात असेल की 2009 मध्ये भारतातील प्रत्येक रहिवाशीला विशिष्ट ओळख क्रमांक देण्याच्या उद्देशाने भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली होती. विशिष्ट ओळख प्रकल्पांतर्गत रजिस्ट्रार व नोंदणी संस्थामार्फत नोंदणी करण्यात येते व केलेल्या कामाचे मूल्यमापन करून शासन त्यांना अनुदान देते.

ऑगस्ट 2010 ला सर्वप्रथम आधार क्रमांक देण्यास सुरुवात केल्यापासून आज पर्यंत 67 कोटी 38 लाख रहिवाशांना भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणामार्फत आधार क्रमांक देण्यात आले आहे. या प्रकल्पावर एकंदरित रु. 4906 कोटी एवढा खर्च (दि 31.8.2014 पर्यंत) झाला आहे. या प्रकल्पाचे उद्दिष्ट समाजातील अतिदुर्बल घटकांसहित सर्व रहिवाशांना ऑनलाईन पडताळणी करता येईल अशी डिजिटल ओळख देण्याचे आहे. यामुळे समाजात समानता सुदृढ होऊन, विविध सेवा-सुविधा अधिक सुलभतेने व कार्यक्षमपणे देता येईल.